कोकणसाद
www.kokansad.com

शनिवार, दि. ६ ऑगस्ट २०२२



हॉटेल मॅनेजमेंट विद्यार्थ्यांच्या स्वागत समारंभात बोलताना प्राचार्य सुभाष सावंत. सोबत इतर.

# हॉटेल मॅनेजमेंट अॅण्ड टुरिझम म्हणजे रोजगाराची हमखास संधी : डॉ. सावंत

## हळबे महाविद्यालयात प्रथम वर्ष विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ

**दोडामार्ग** : येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयामध्ये हॉटेल मेनजमेंट अँड टुरिझमच्या प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी स्वागत समारंभ नुकताच पार पडला.

या प्रसंगी हॉटेल मेनजमेंट विभाग प्रमुख प्रा. कौशिक शेटये यांनी हॉटेल मेनजमेंट क्षेत्रातील करियरबाबत विद्यार्थ्यांना माहिती दिली. हॉटेल मॅनेजमेंटमधील किचन, सेवा, आदरातिथ्य, गृह व्यवस्था या प्रमुख चार विभागामध्ये पुढे जाऊन किती मोठे करिअर उपलब्ध आहे, याची माहिती दिली. तसेच १००% नोकरीची हमीबाबत पंचतारांकित हॉटेल्स, कार्पोरेट सेक्टर, क्रुज लाईन, एअर लाईन कॅटरिंग, परदेशात नोकरी आणि इंडस्ट्रीअल ट्रेनिंग प्लेसमेंट याबद्दल सुद्धा सविस्तर माहिती दिली. कोकण तसेच गोव्यामध्ये पर्यटन वाढीमुळे हॉटेल व्यवसायाला तेजी आली आहे. त्यामुळे भविष्यात या क्षेत्राला चांगला वाव आहे याचा आपण फायदा करून घेतला पाहिजे असे आवाहन त्यांनी केलं. यावेळी व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष सावंत, डॉ. एस. एन. खडपकर, प्रा. आशिता नाईक उपस्थित होते. प्राचार्य डॉ. सुभाष सावंत यांनी प्रथम वर्ष विद्यार्थ्यांचे स्वागत करून आपण हा कोर्स शिकता शिकता पैसे कमवू शकतो व आपले करिअर घडवू शकतो असा कानमंत्र देत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.